# Maza avadta khel essay in marathi 200 words pdf

फुटबॉल हा माझा सर्वात आवडता खेळ आहे. काहींना चेंडूफळी, कॅरम, खो-खो, कब्बडी सारखे खेळ आवडतात. मी शाळेच्या दिवसापासून माझ्या सवंगड्यांसोबत हा खेळ खेळतो. मला हा खेळ खेळायला आणि पाहायला खूप आवडतो. फुटबॉल खेळताना माझ्या मनात आनंद तर असतोच पण एकजुटीची सुद्धा भावना निर्माण होते, कारण हा खेळ दोन संघात खेळला जातो. या खेळामुळे माझी शारीरिक लवचिकता तर वाढलीच आहे, त्याहून अधिक माझी मानसिक मजबुती वाढली आहे. फुटबॉल खेळण्यासाठी निरोगी आणि चपळ राहणे खूप आवश्यक असते, म्हणून मी प्रयत्न करतो कि जास्तीत जास्त संतुलित आहार घेऊ शकेन. माझ्या कुटुंबातील इतर सदस्यांनाही फुटबॉल आवडतो, आणि आम्ही रविवारी सुट्टी दिवशी एकत्र येऊन खेळतो.

मला फुटबॉल खेळण्यात खूप आनंद मिळतो कारण तो मला माझ्या स्वप्नांच्या शिखरावर पोहोचण्यासाठी प्रेरणा देतो. मी माझ्या कॉलेजच्या फुटबॉल संघाचा कर्णधार आहे, आणि मी फुटबॉल खेळताना अनेक चांगले अनुभव मिळवले आहेत. हा खेळ मला कडक अनुशासन पाळण्याची शिकवण देतो. मला दिवसेंदिवस या खेळामध्ये माहीर व्हयायचा आहे. या खेळात जोखीम असतेच, तुम्हाला एवढी इजा किंवा दुखापत सुद्धा होऊ शकते. एक दिवस मला भारतासाठी आंतरराष्ट्रीय फुटबॉल खेळायचे माझे स्वप्न आहे. फुटबॉल हा माझ्या हृदयाच्या खूप जवळचा खेळ आहे, आणि त्याचे महत्व माझ्या जीवनात नेहमीच असेल.